नि.फौ.ख.क्र. २५३/२०२२

सरकार वि. अब्दुल करीम

नि.क्र.५९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ यांची जबानी.**

देवाची शपथ खरे सांगतो की,

माझे नांव – मोहम्मद जुबेर मोहम्मद नासीर,

माझे वय – ३० वर्षे, धंदा– मजुरी,

राहणार – नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलढाणा.

– – – – –

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.बी.व्ही. वाहूरवाघ यांच्यामार्फत**

फिर्यादी माझी बहिण आहे. तिचा विवाह आरोपी क्र.१ याचे सोबत चार ते पाच व वर्षापुर्वी पिंपळगांव राजा येथे झाला. लगनानंतर ती आरोपींकडे एकत्र कटुंबामध्ये नांदकण्याकरीता गेली होती. ती आरोपींकडे नांदत असतांना आरोपी आठ ते पंधरा दिवस चांगली वागणुक दिली. त्यानंतर माझ्या बहिणीला परत माहेरी आणुन सोडले. आरोपी क्र.१ गांजाचे व्यसन होते. माझ्या बहिणीची सासु तिला कामकाज करता येत नाही, स्वंयपाक करता येत नाही या कारणावरुन त्रास देत होती. आरोपी क्र.१ हा माझ्या बहिणीकडे दोन लाख रुपये माहेरुन आणण्याचा तगादा लावत असे. माझ्या बहिणीनीने सदरची रक्कम आणण्यास नकार दिला असता आरोपींनी माझ्या बहिणीला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर एक महिन्यानंतर माहेरी आणुन सोडले.

२. माझी बहिण माहेरी असतांना माझे मामा फिरोजखान व अमीनखान असे आरोपींना समजाविण्यास गेले असता आरोपींनी त्यांना सांगीतले की, दोन लाख रुपये देत नाही तो पर्यंत कोणत्याही प्रकारचा समझोता होणार नाही असे त्यांना सांगीतले. महीरुनबी व कमरुनबी ही माझ्या बहिणीच्या नंनद आहेत व त्यांचे पती आहे. महीरुनबी, कमरुनबी व सैय्यद हे माझ्या बहिणीच्या सासरी येवुन आरोपींना चिथावणी देत असे व म्हणत असे की माझ्या बहिणीला सोडुन दया. तसेच आरोपी क्र.१ याला तलाख देण्याकरीता म्हणत होते. आरोपी क्र.१ हा माझी बहिण गर्भवती असतांना तिला गर्भपात करण्याकरीता सांगत असे. माझ्या बहिणीच्या मुलाला आरोपीपैकी कोणीही पाहण्याकरीता आजपावेतो आलेले नाही. त्याबाबत माझ्या बहिणीने फिर्याद दिली होती. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी केली आहे.

## उलटतपास आरोपी क्र.१,३,४,५ तर्फे वकील श्री.जानवानी यांच्यामार्फत

३. माझे शिक्षण ८ वी पर्यंत झाले आहे. मला मराठी लिहता वाचता येत नाही. पोलीसांनी माझा जबाब कोणत्या दिवशी, वेळी घेतला हे मला सांगात येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा जबाब पोलीस स्टेशनमध्ये लिहण्यता आला. हे म्हणणे खरे आहे की, मी सरतपासामध्ये सांगीतलेला सर्व मजकुर मला माझ्या बहिणीने मला सांगीतलेला आहे. आम्ही तीन भाऊ व तीन बहिणी असे आहोत. हे म्हणणे खरे नाही की, अली अॅटो रिक्षा चालक आहे. मौसीम हा माझा भाऊ असुन तो अॅटो रिक्षा चालवितो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणीच्या सासरे हे मयत झालेले असुन त्यांच्या अंत्यविधीकरीता मी व माझे आई वडिल गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे बहिणीचे सासरे मयत झाले त्यावेळी आम्ही आरोपींसोबत वादकरुन माझ्या बहिणीला परत माहेरी घेवुन आले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणीने सांगीतल्याप्रमाणे मी पोलीस स्टेशनला माझे बयाण दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कमरुननिसा, मेहरुनिसा व त्यांचे पतीने माझ्या बहिणीला त्रास हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बहिणीला मुलगा झाला त्यानंतर आरोपी कधीही माझ्या घरी आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझी सर्वात लहान बहिण आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांची इच्छा होती की, तिने नांदुरा येथे येवुन राहावे. माझी बहिण नांदुरा येथे कोणत्या तारखेपासुन राहत आहे हे मी सांगु शकत नाही. परंतु साक्षीदार सांगतो की, तिच्या लग्नानंतर एक ते दोन महिन्यापासुन ती नांदुरा येथे वास्तव्यास आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या बहिणीकडे दोन लाख रुपयाची मागणी करीत होते व मारहाण करीत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ याला माझी बहिण नेहमी नांदुरा येथे राहण्यास आग्रह करीत होती व सदरील बाब आरोपी क्र.१ न ऐकल्यामुळे आम्ही आरोपी विरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणीला मुलगा झाल्याची बाब आम्ही आरोपी क्र.१ याला सांगीतली नाही. माझे मामा आरोपींना समजाविण्याकीरता कोणत्या तारखेला व किती वेळा गेले हे मला सांगता येणार नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या बहिणीच्या सांगण्याप्रमाणे साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामधील संपुण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

## उलटतपास आरोपी क्र.२ व ६ तर्फे श्री उबेद शेख वकील यांचे मार्फत

४. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात येण्यापुर्वी माझ्या बयाणामध्ये काय लिहले याबाबत मला माहित नव्हते. मी माझ्या बहिणीच्या नंदोईचे नाव सैय्यद बाबा सैय्यद दाऊद असे

सांगीतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.६ याचे नाव शेख करीम शेख रफीक आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणीची सासु तिला स्वयपांक येत नाही या कारणावरुन त्रास देत होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणीची नंनद व नंनदोई हे आरोपी क्र.१ याला सांगत असे की, तु फिर्यादीला सोडुन दे व तिचा गर्भपात कर हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, इतर आरोपी आरोपी क्र.१ याला चिथावणी देत होते हे मी खोटे सांगत आहे. हे मला सांगता येणार नाही की, आरोपी सैय्यद हे माझ्या घरी आले किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सैय्यद हा माझ्या बहिणीच्या सासरी कधीही येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपी फिर्यादीला पैशावरुन त्रास देत होते व धमकी देत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपी एकत्र राहले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

RAVINDRA ASHOK MISAL

Digitally signed by RAVINDRA ASHOK MISAL
Date: 2025.02.28 10:56:27 +0530

नांदुरा. (रविंद्र अ.मिसाळ)

दिनांक – २७.०२.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,नांदुरा.

मी खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील पुरावा हा मुळ पुराव्याप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :– | मनोज गजानन देशपांडे, |
| न्यायालयाचे नांव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालय नांदुरा. |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २८.०२.२०२५ |